# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड** **दिनांक ०९/०८/२०१८**

## १)घरफोडी :-

**अ) मांडवी :-** दिनांक ०७.०८.२०१८ रोजी चे २२.०० ते दि. ०८.०८.२०१८ चे ०२.०० वा. चे दरम्यान अक्षय ज्वेलर्स दुकान मांडवी ता. किनवट जि. नांदेड येथे, यातील फिर्यादीचे अक्षय ज्वेलर्स दुकानचे शटटर यातील अज्ञात चोरटयाने उचकटुन आत प्रवेश करुन विक्री करीता ठेवलेले सोन्याचे डोरले कि. अ. १६,०००/-रु व नगदी ४,००० /-रु असा एकुण २०,०००/-रुपयाचा माल चोरुन नेला. वगैर **फिर्यादी संजय नारायण सकवान, वय ४० वर्षे व्यवसाय ज्वेलर्स दुकान रा. मांडवी ता. किनवट** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. मांडवी** गुरनं. ५२/२०१८ कलम ४५७, ३८० भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोहेकॉ/ १६७२ यम्मलवाड , मो.नं. ९८२३४१५०२९** हे करीत आहेत.

**ब) मुदखेड :-** दिनांक ०८.०८.२०१८ रोजी चे ०२.०० वा. चे सुमारास मोंढा मुदखेड जि. नांदेड येथे, यातील अज्ञात आरोपीने दुकानातील टीनपत्रा कापुन आत प्रवेश करुन दुकानातील नगदी ३०,०००/-रुपये चोरून नेले व श्रीराम वस्त्र भांडार या दुकानातील सी. सी. टी. व्ही. कॅमेरा फोडुन १०,०००/-रुपयाचे नुकसान केले. वगैर **फिर्यादी गोविंदप्रसाद बालाप्रसाद कालाणी, वय ६५ वर्षे व्यवसाय शेती व व्यापार रा. सुभाषगंज मुदखेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. मुदखेड** गुरनं. १४२/२०१८ कलम ४५७,३८०,४२७ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोहेकॉ/ ८३८ बाचेवाड , मो.नं. ७८४१८९९१७७** हे करीत आहेत.

**क) नांदेड ग्रामीण :-** दिनांक ०५.०८.२०१८ रोजी चे ११.०० ते १२.३० वा. चे सुमारास फेमस फंक्शन हॉल, वाजेगाव नांदेड, ता. जि. नांदेड येथे, यातील फिर्यादीचे चुलत भावाचे लग्न लावून फंक्शन हॉलचे रुममध्ये गेले असता कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीचे कुंटूबियांची बॅग मध्ये ठेवलेले सोन्याचे दागिणे व नगदी पैसे असा एकुण १,११,०००/-रुपयांचा माल चोरुन नेला. वगैर **फिर्यादी महमंद जाकेर पि.महमद इसाख, वय ३२ वर्ष, व्यवसाय व्यापार, रा. आश्रफ नगर, हिंगोली गेट नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. नांदेड ग्रामीण** गुरनं. ३५५/२०१८ कलम ३८० भादंवी प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास सपोउपनि/केंद्रे , मो.नं. ९८२३९९६३१४** हे करीत आहेत.

## २)मंदिर चोरी :-

**मुक्रमाबाद :-** दिनांक ०८.०८.२०१८ रोजी चे १३.०० वा.चे सुमारास हनुमान मंदिर मौ.दापका(गु) ता.मुखेड जि. नांदेड येथे, यातील नमुद आरोपीतांनी संगणमत करुन गावातील हनुमान मंदिरातील दानपेटीचे कुलूप लोखंडी रॉडने तोडतांना मिळुन आले. वगैर **फिर्यादी हावगी होनप्पा सोलापुरे, वय ४० वर्ष, व्यवसाय शेती, रा. दापका(गु), ता.मुखेड जि.नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. मुक्रमाबाद** गुरनं. १४७/२०१८ कलम ३७९,५११,३४ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोहेकॉ/ २००० सुरनर , मो.नं. ७४४७२७१७२७** हे करीत आहेत.

## ३)मो. सा.चोरी :-

**नांदेड ग्रामीण :-** दिनांक ०६.०८.२०१८ चे १८.०० ते दिनांक ०७.०८.२०१८ वे ०८.०० वा. चे दरम्यान अंबिका अपार्टमेन्ट पार्किंग मधुन, विष्णुपूरी नांदेड येथे, यातील फिर्यादीची ॲक्टीवा कंपनीची स्क्युटी क्रंमांक एम.एच.२४/ए.व्ही. ७५२८ अंदाजे किंमत ४९,०००/- रुपयाची आज्ञात चोरटयाने चोरुन नेली. वगैरे **फिर्यादी श्रीमती शिवकांता पि.रामराव गुरमे, वय ३२ वर्षे व्यवसाय नौकरी, रा. अंबिका अपार्टमेन्ट तिसरा मजला, विष्णुपूरी नांदेड ता. जि. नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. नांदेड ग्रामीण** गुरनं ३५६/२०१८ कलम ३७९ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि तिडके, मो.क्र. ९२८४३५२००९** हे करीत आहेत.

## ४) फसवणुक :-

**अ) शिवाजीनगर :-** दिनांक १०.१०.२०१२ ते सन २०१६ पावेतो कोठारी कॉम्प्लेक्स, शिवाजीनगर नांदेड येथे ,यातील नमुद आरोपीतांनी संगणमत करुन गरिमा रिअल इस्टेट अॅन्ड अलाईड लि. व गरिमा होम अॅन्ड फॉर्म हाउस लि. या कंपनीकडून गुंतवलेल्या गुंतवणुकीवर सहा वर्षाता दाम दुप्पट पैसे देण्याचे व हाप्तेवारी गुंतवणुक केल्यास दिड पट व महाराष्ट्रात कुठेही मर्जीनुसार प्लॉट देण्याचे अमिष दाखवून कंपनीचे खोटे कागदपत्र तयार करुन खोटे प्रमाणपत्र दिले व फिर्यादी व साक्षीदार यांचे गुंतवलेले ११,५४,१५०/- रुपयाची अन्यायाने विश्सासघात करुन आर्थिक फसवणुक केली. वगैरे **फिर्यादी सदाशिव गोविंदराव गोणेवाड, वय ३२ वर्षे व्यवसाय शेती, रा.माळकौठा, ता.मुदखेड, जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पो.स्टे. शिवाजीनगर** गुरनं. १८५/२०१८ कलम ४२०, ४०६,४६८,४७१,३४, भादंवि कलमान्वये गुन्हा दाखल असून तपास **पो.नि./ननवरे आर्थिक गुन्हे शाखा नांदेड मो. नं. ८८०५१८६११३** हे करीत आहे.

**ब) मुक्रमाबाद :-** दिनांक ११.०३.२०१८ चे १५.०० वा.चे सुमारास मौ.बाऱ्हाळी, ता.मुखेड जि. नांदेड येथे ,यातील नमुद आरोपीतांनी संगणमत करुन फिर्यादीस महाराष्ट्र अर्बन को.आ.क्रेडीट सोसायटी बाऱ्हाळी मध्ये नौकरी लावतो म्हणून फिर्यादीकडून १,००,०००/-रुपये घेतले व साक्षीदारास पण नौकरी लावतो म्हणून फिर्यादीची व साक्षीदार यांची फसवणुक केली. वगैरे **फिर्यादी रोहित लक्ष्मण पवार, वय २४ वर्षे व्यवसाय शिक्षण, रा.निवळी ता.मुखेड, जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पो.स्टे. मुक्रमाबाद** गुरनं. १४८/२०१८ कलम ४२०, ३४ भादंवि कलमान्वये गुन्हा दाखल असून तपास **मपोउपनि/जाधव, मो. नं. ९१५८१९१२५७** हे करीत आहे.

## ५) शासकीय कामात अडथळा :-

**ईतवारा :-** दिनांक ०८.०८.२०१८ रोजी चे १५.२० वा. चे सुमारास, पो.स्टे.ईतवारा नांदेड येथे, यातील फिर्यादी ही यातील नमुद आरोपीतांचा मुलास पो.स्टे. ला गुन्हयांचे तपासात आनले असता आरोपीतांनी संगणमत करुन अश्लिल शिवीगाळ करुन फिर्यादीचे उजवे हाताचे पोटरीवर चावा घेवून दुखापत केली व फिर्यादीस कमरेवर लाथा बुक्यांनी मारहाण केली. सदर आरोपीतांनी इतर पोलीस कर्मचारी यांना पण अश्लिल शिवीगाळ करुन कॉलर पकडून थापड बुक्यांनी मारहाण करुन पोलीस कायदेशिर शासकिय काम करित असतांना शासकिय कामात आडथळा निर्माण केला. वगैरे **फिर्यादी मपोकॉ/२७०२ मिरा दादाराव सावंत, पो. स्टे. ईतवारा** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पो.स्टे. ईतवारा** गुरन २५१/२०१८ कलम ३५३,३३२,५०४, ५०६, ३४ भादंवि कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/गायकवाड मो.क्र. ०२४६२-२३६५१०** हे करीत आहेत.

## ६) कल्याण नावाचा मटका जुगार :-

**अ) कंधार :-** दिनांक ०८.०८.२०१८ रोजी चे १५.०५ वा. चे सुमारास जिल्हा परिषद हायस्कुल मैदानात कंधार, जि.नांदेड येथे यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या कल्याण नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असताना नगदी व जुगाराचे साहित्यासह ४७१० /- रुपयासह मिळुन आले वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/१७०१ सुरेश सुभानजी वाघमारे, ने. स्था.गु.शा.नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. कंधार** गुरन. २२४/२०१८ कलम १२(अ) मजुका अन्वये गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/कागणे, मो.नं. ७५८८१५२०५९** हे करीत आहेत.

**ब) लोहा :-** दिनांक ०८.०८.२०१८ रोजी चे २०.०० वा. चे सुमारास अमोल जनरल स्टोअर्स समोर लोहा, जि.नांदेड येथे यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या बॉम्बे ओपन नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असताना नगदी व जुगाराचे साहित्यासह २२६० /- रुपयासह मिळुन आले वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/२६९७ माधव नामदेव केंद्रे, ने. स्था.गु.शा.नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. लोहा** गुरन. १२६/२०१८ कलम १२(अ) मजुका अन्वये गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/शेख, मो.नं. ९४०५०००७८६** हे करीत आहेत.

## ७) तिर्रट नावाचा जुगार :-

**किनवट :-** दिनांक ०८.०८.२०१८ रोजी चे १७.५० वा. चे सुमारास घोटी शिवार ता.किनवट, जि. नांदेड येथे यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या तिर्रट नावाचा जुगार खेळत व खेळवित असताना नगदी व जुगाराचे साहित्यासह २६५० /- रुपयासह मिळुन आले वगैरे **फिर्यादी पोउपनि- कपिल मुरलीधर आगलावे, पो. स्टे. किनवट** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. किनवट** गुरन. १८३/२०१८ कलम १२(अ) महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/आगलावे मो.नं. ९७६७७७७८८४** हे करीत आहेत.

## ८) शेतकरी आत्महत्या :-

**मुदखेड :-** दिनांक ०७.०८.२०१८ रोजी चे २१.०० वा. चे सुमारास मौ.माळकौठा तलावत, ता.मुदखेड जि. नांदेड येथे, यातील **मयत नामे शिवाजी आनंदा गोणेवाडे, वय ३५ वर्षे व्यवसाय शेती रा. माळकौठा, ता.मुदखेड, जि.नांदेड** हा नमुद ठिकाणी सतत नापीकीचा मानसिक त्रास घेवून तलावात पडून पाण्यात बुडून आत्महत्या केली. वगैरे **खबर देणार मारोती आनंदा गोणेवाड, वय ३० वर्षे व्यवसाय शेती रा. माळकौठा, ता.मुदखेड, जि. नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. मुदखेड** आ.मृ. नं. २०/२०१८ कलम १७४ सिआरपीसी प्रमाणे आ. मृ. दाखल असुन **तपास सपोनि/खंडागळे, मो.क्र. ९९२३१७३३०७** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधीक्षक कार्यालय,नांदेड
फोन नंबर ०२४६२-२४४४७४.